## ४. काळ

वाक्यात दिलेल्या क्रियापदावरून जसा क्रियेचा बोध होतो तसेच ती क्रिया कोणत्या वेळी घडत आहे याचा जो बोध होतो त्याला '**काळ**' असे म्हणतात.

**खालील कृती सोडवा व काळाचे नाव लिहा. (कंसांतील क्रियापदांचे योग्य रूप वापरा.)**

(१) मी या वर्षी काश्मीर सहलीला ......... (जाणे)
(२) काल झालेल्या निबंध स्पर्धेत मी उत्तम निबंध ......... (लिहिणे)
(३) हे बघ आनंद, उद्या तू सहलीला ......... असल्यामुळे लवकर ......... . (जाणे, उठणे)
(४) परवा सुरेशने सुरेल गीत ......... (गाणे)
(५) काल बाळूने बागेतील आंबे शेजाऱ्यांना ......... (देणे)
(६) वकिलाने आरोपीला आपली बाजू मांडू......... (देणे)
(७) भविष्यात मी कधीतरी विमानातून प्रवास ......... (करणे)
(८) हसणे हा मनुष्यस्वभाव ......... (असणे)
(९) काल रात्री सारखा विजांचा गडगडाट......... (होणे)
(१०) उद्या मी ही मालिका पुन्हा......... (बघणे)

**काळ**

- वर्तमानकाळ
  - सामान्य
  - अपूर्ण
  - पूर्ण
  - चालू पूर्ण (रीती काळ)
- भूतकाळ
  - सामान्य
  - अपूर्ण
  - पूर्ण
  - चालू पूर्ण (रीती काळ)
- भविष्यकाळ
  - सामान्य
  - अपूर्ण
  - पूर्ण
  - चालू पूर्ण (रीती काळ)

**खालील वाक्ये लक्षपूर्वक वाचा.**

(१) समीर पुस्तक वाचत असतो.
(२) समीर पुस्तक वाचत असे.
(३) समीर पुस्तक वाचत जाईल.
(४) विद्यार्थी सतत अभ्यास करत असतात.

**रीती काळाची वैशिष्ट्ये**

- (१) सामान्यपणे संयुक्त क्रियापदाचा वापर असतो.
- (२) संयुक्त क्रियापदावरून क्रियेचे सतत चालणारे रूप समजते. क्रियेची पुनरावृत्ती दिसते.
- (३) क्रियापदाच्या रूपावरून सतत चालणारी क्रिया कोणत्या काळात चालली आहे हे कळते.
- (४) कधी धातूला प्रत्यय लावून क्रियापद तयार होते. उदा., खात, बोलत, करत इत्यादी.

**रीती काळाचे प्रकार**

(१) रीती वर्तमानकाळ

उदा., स्पर्धा परीक्षा देणारे विद्यार्थी सतत अभ्यास करत असतात.

(२) रीती भूतकाळ

उदा., स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण झालेले विद्यार्थी सतत अभ्यास करत असत.

(३) रीती भविष्यकाळ

उदा., स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी विद्यार्थी सतत अभ्यास करत राहतील.

(१) धावपटू धावण्याचा सतत सराव करत असतात.
(२) माझ्या एकत्र कुटुंबात आजी उत्तम संस्कार करत असे.
(३) हिरव्या पालेभाज्या आवश्यक असल्यामुळे सर्वच व्यक्ती रोजच्या आहारात त्या खात जातील.

## कृती

**(१) खालील वाक्यांतील रीती काळाचा प्रकार ओळखा.**

(१) नजमा उत्तम कविता लिहीत असे. .............
(२) मी लोकांना मदत करत राहीन. .............
(३) अभिजित सतार उत्तम वाजवत असतो. .............
(४) शिक्षक जे सांगतात, ते विद्यार्थी लक्षपूर्वक ऐकत असतात. .............
(५) एका गावात एक उत्तम चित्रकार राहत होता. .............
(६) राहुल प्रार्थनेला नेहमीच उशिरा येत असतो. .............
(७) माधवराव नेहमीच सुगम संगीत ऐकत असत. .............
(८) दादासाहेब दररोज फिरायला जात असतात. .............
(९) तो सदोदित आजारी पडत असतो. .............

**(२) खालील वाक्यांतील काळ ओळखून त्यापुढे दिलेल्या कंसातील सूचनेनुसार वाक्यबदल करा.**

(१) मी तबला वाजवतो. (रीती भूतकाळ करा.)
(२) मुले खो-खो खेळत होती. (पूर्ण भूतकाळ करा.)
(३) रस्त्याच्या डाव्या बाजूने चालावे. (साधा वर्तमानकाळ करा.)
(४) तो विद्यार्थी अडखळत वाचत असतो. (साधा भूतकाळ करा.)
(५) वर्गातील विद्यार्थी लक्षपूर्वक ऐकत होते. (साधा भविष्यकाळ करा.)